# यशोगाथा गजबची

## नाव : श्री शंकर राठोड

रा : डोलारी ता दारव्हा जि: यवतमाळ

मोबाइल:7588042815, 968906581

क्षे: 30 गुंठे 1 पॅकेट

लागवड : 29/05/12

मी दारव्हा तालुक्यातील डोलारी येथील शेतकरी असुन मला नवीन प्रयोग करण्याची आवड आहे, म्हणुण मी या वर्षी भाजीपाला बियाणे क्षेत्रातील विश्वासनीय मानल्या जाणाया कलश सिडस प्रा लि जालना च्या गजब या वाणाची निवड करण्याचे ठरविले, नविन वाणाच्या लागवडीस सुरवातीला मन तयार होत नव्हते परंतु कलश सिडसच्या गुणवत्तेवर व संशोधणावर पुर्ण विश्वास होता, म्हणुण गजब या वाणची 5, 2 वर ठीबक वर लागवड दिनांक 29/05/12 रोजी 30 गुंठे क्षेत्रावर 1 पॅकेटची लागवड केली, माझया शेतावर गजबची खरी परिक्षा लरगणार होती कारण मी गेल्या 4 ते 5 वर्षा पासून लावत असलेल्या विश्वासाच्या दोन वाणांच्या बाजुला गजब ला स्वत:च अस्तित्व सिध्द करावं लागणार होत, परंतु आज गजब माझया सर्वाधिक आवडीचे व विश्वासाचे वाण बनले आहे, कारण या वाणाने त्याची रोगप्रतिकारक क्षमता तर दाखवूण दिलीच परंतु मझया आवडीच्या दोन्ही वाणांना उत्पादणात मागे सोडल आहे, आज इतर वाण लाल पडून संपून गेले असतांना माझया शेतील गजब 5 वेचण्यांनंतर आजही हिरवी कंच असून तिला 40 ते 45 बोंड शिल्लक आहेत,

माझया निरीक्षणात मला एक गोष्ट प्रकाशाने जाणवली की गजबची पाने केसाळ असल्याणे ते रसशोषणारया कीडींना (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) दुर ठेवण्यात यशस्वी होउन आपले कमीत कमी 2 फवारणी तरी वाचवते, शिवाय या वाणाला जमीनी पासुन 4 ते 6 बोटं अंतरावरच 3 ते 5 मुख्यफळफांदया (मोनोपोडीया ) लागतात, या मुख्यफळफांदयांमुळे झाड डेरेदार बनुण दोन सरींतील 5 फुट अंतर देखील पुर्णपणे झाकुन जाते,




मुख्यखोडावरील कांडयांतील अंतर (Internodal Distance) कमी असल्याने इतर फळफांदयादेखील जवळ जवळ लागतात त्यामुळे 5 ते 6 फुट उंचीच्या झाडावर 30 ते 35 फळफांदया (सिंपोडीया ) लागतात, जितक्या जास्त फळफांदया तितके जास्त बोंडांची संख्या व जितकी जास्त बोंडं तितके जास्त उत्पन्न हे गणित जुळते, मी गजबचा कापुस वेगळा मोजला असल्याने माझया लक्षात आले की गजबच्या बोंडाचे सरासरी वजन 6 ते 6 . 5 ग्रम असुन पहील्या दोन वेचणीत 6 . 80 क्विंटल कापुस निघला तर तिसरया व चौथ्या वेचणीत अणुक्रमे 2. 50 व 3 . 28 क्विंटल आणि पाचव्या वेचणीला 2 . 50 क्विंटल कापुस निघला आहे, आजपर्यंत पाच वेचण्यांमध्ये एकुण 15 . 08 क्विंटल कापुस निघला असून प्लॉटची हिरवळ अजुनही कायमअसून प्रत्येक झाडाला आजही 40 ते 45 बोंड शिल्लक आहेत, माझया या गजब च्या प्लॉटची चर्चा परिसरात झाल्याने परिसरातील शेतकरी गजबच्या प्लॉटला भेट दयायला येतातच परंतु कलश सिडस प्रा लि जालना येथुन कपाशीचे संशोधक डॉ श्री नागरे साहेब व विभागिय विपणण व्यवस्थापक श्री सानप साहेब यांनी सुद्वा माझया गजबच्या प्लॉटला भेट दिली आहे, मी गजब या वाणा विषयी आतिव समाधाणी आहे,

नाव : श्री शंकर राठोड

मोबाइल: 7588042815, 968906581